ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 9 | MAY - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# लोकशाहीर विलास घोगरे

प्रा. जगजीवन विश्वनाथ कोटांगले
मराठी विभाग, कला, वाणिज्य महाविद्यालय, पे.पंप, जवाहरनगर, भंडारा (महाराष्ट्र)

## प्रस्तावना :—



महाराष्ट्रातील लोकशाहीरांच्या शाहिरी परंपरेत अण्णाभाऊ साठे, अमरशेख, गवाणकर यांच्यानंतर शाहिरी परंपरेला जागृत ठेवणारा लोककवी, लोकगायक शाहीर कॉम्रेड विलास घोगरे यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. जलसा, कव्वाली, प्रेमगीते, भावगीते, रचना, गायन करता करता संघटनेच्या क्रांतिकारी विचाराने प्रेरीत होऊन व्यावसायिक गाणी गायची नाहीत. अशी शपथ घेऊन दलित, शेतमजूर, कामगार, आदिवासी यांच्या श्रमांची, घामांची, कष्टकऱ्यांच्या नसानसातून सळसळणाऱ्या रक्ताला उसळी देणारी लोकसंगीताचा साज असलेली गाणी लिहायला, गायला सुरवात केली आणि प्रमुख शाहीरांच्या यादीत आपल्या नावाचा अमिट ठसा उमटविला.

मराठी, हिंदी, गुजराती या तीन भाषेत त्यांची गाणी हुकुमत गाजवित राहिली. दलित, शोषित, कष्टकरी जनतेच्या संघटित होण्यासाठी त्यांनी देहबलिदान केले. या वंचितांच्या मुक्तीचा अंतिम मार्ग मार्क्सवाद—लेनिनवाद—आंबेडकरवाद—माओ विचारधारा आहे. हा त्यांचा विश्वास होता. त्यांची लेखणी जातवर्गीय सामाजिक वास्तवाला समर्पित आहे. मार्क्सवादी—लेनिनवादी—माओवादी विचारांच्या मुशीत घडलेली असलेली त्यांची लेखणी वर्गीय शोषणाविरूद्धची तुतारी बनून जातीय शोषण दमनविरूद्धाची ही गाणी ठरली. कॉम्रेडसच्या कलावंत, सच्चा कवी, सच्चा भीमसैनिक व सच्चा माणूस महाराष्ट्रातील पुरोगामी व क्रांतिकारक चळवळीचा दुवा म्हणून विलास घोगरे लोकप्रिय झाले.

## विलास घोगरे व्यक्ती आणि वाङ्मय :—

विलास घोगरे यांचा जन्म १ जून १९४६ रोजी पुण्यातील मंगळवारपेठ येथे झाला. बालपणी वडील वारल्यानंतर काका—आत्यांनी त्यांचा सांभाळ केला. शाळेत असतानाच ते काव्य रचू लागले. १० वी नापास झाल्यानंतर पुन्हा कधी परीक्षा दिली नाही. घरची परिस्थिती प्रतिकूल असल्यामूळे भाजीपाला विकण्यापासून तर कसायापर्यंतची नानाविध कामे त्यांनी केली. पूढे पोटाची खळगी भरण्याकरिता ते मुंबईत आले. मुलूंडच्या लांडेवाडी झोपडपट्टीत १० बाय १० च्या खोलीत त्यांनी सबंध आयुष्य घालविले. तेथे क्रांतिकारक कामगार कार्यकर्त्यांशी विलासचे संबंध जुळले. येथूनच विलासचा जीवनाची नवी वाट मिळाली. पुढे भाजप कार्यालयात नोकरी केली. १९८२ मध्ये मुंबईच्या एका खाजगी शाळेत शिपायाची नोकरी लागली तेथे ते शेवटपर्यंत कामाला होते. १९८१—८२ च्या दरम्यान 'नौजवान भारत सभा' व 'आव्हान नाटयमंच' या क्रांतिकारी संघटनेचे सभासद झाले. पुढे नक्षलबारीच्या नवजनवादी क्रांतीचा मार्ग स्वीकारला.

११ जुलै १९९७ रोजी रमाबाई आंबेडकर नगरात पुतळा विटंबनेनंतर झालेल्या पोलीस गोळीबारात गेलेले १० बळी आणि त्यानंतर झालेला उद्रेक या गोष्टींच्या निराशेने त्यांनी आपल्या निवासस्थानी गळफास लावून आत्महत्या केली. त्यांच्या भिंतीवर खडूने पोलीस गोळीबाराचा धिक्कार आणि गोळीबारात शहीद झालेल्या भूमिपुत्रास मानाचा मुजरा ! आणि आंबेडकरी एकजूट जिंदाबाद असे लिहीले होते. त्यामुळे त्यांचे मरण विद्रोही क्रांतिकारकाचे बलिदान ठरलेले मानले जाते.

शाहिर विलास घोगरे यांचे गीत व संगीतावर अफाट प्रभुत्व होते. ते शीघ्रकवी म्हणून प्रख्यात होते. त्यांचे मराठी, हिंदी, गुजराती या तिन्ही भाषेवर प्रभुत्व होते. 'भगतसिंगाचा पोवाडा', 'मराठी नामांतर', 'गीत', 'लोकगीते', 'लावण्या', 'शाहिरी' मधून भगतसिंगाच्या पोवाडयापासून तर शेतमजूर—कष्टकरी, बुद्धीजीवी वर्गाच्या व स्त्रियांच्या स्वातंत्र्याबद्दलच्या अनेक मूलभूत प्रश्नांवर त्यांनी अनेक लोकगीते रचली. तसेच 'हमारा शहर' या डाक्युमेंटरी फिल्मला त्यांनी गाणी लिहून दिलीत. तसेच आंध्रप्रदेशातील जन नाटयमंडळीची अनेक गाणी कॉ. गदर सोबत बसून त्यांनी तेवढयाच ताकदीने अनुवादीत केली. एखादया घटनेवर शेर लिहिण्यातही ते माहीर होते. आव्हानतर्फे प्रकाशित झालेल्या नक्षलबारी पर्वाच्या कविता 'आणि ठिणगी पेटली' या कविता संग्रहामध्ये त्यांचचं 'भल्लरी' या गीतांचा समावेश केलेला आहे. 'हमारा शहर' या आनंद पटवर्धन यांच्या वृत्त चित्रपटात त्यांनी टायटल साँग स्वत: गायिले आहे. अशा अनेक काव्य रचनांनी व गीतांनी साहित्यात भर टाकली तशी क्रांतिकारी चळवळीतही जान आणण्याचं व तिला गतिमान करून प्रबोधनाचं फार मोठं काम त्यांनी केलेलं आहे.

## विलास घोगरे यांचे शाहिरी महात्म्य :—

सत्यशोधक फुलेवादी तमाशानंतर आंबेडकर विचार प्रेरित बंडाचे निशान घेऊन लोकांपुढे आलेले. हे जलसे समग्र दास्य टाकून देण्याचा संदेश देत होती. खेडे म्हणजे मनुवादाला माननारे वेडे आणि शहर म्हणजे स्वातंत्र्याचे विजय देणाऱ्या संघर्षाचे आगर अशी सुभाषिते आंबेडकरी जलसाकार देत होते. सरंजामशाही विरूद्ध भांडवलशाही, भांडवलशाही विरूद्ध कामगार असा आशावाद सांगणारी वगनाट्ये जलसाकार गीत संवादाद्वारे मांडीत असत. यांची प्रेरणा विलास घोगरे यांना लाभली, या प्रेरणेतूनच त्यांची शाहिरी फुलली आहे. याबाबतीत आंबेडकरवादी लेखक बाबुराव बागूल यांचे मत नोंदवावेसे वाटते ते म्हणतात, ''आंबेडकरी जलसे काम करीत असतानाच लालबावटा कला पथक वर्ग संघर्ष मांडीत उदयाला आले. अशी सांस्कृतिक, सामाजिक उन्नतीची वर्गीय, राजकीय संघर्षाची आणि कष्टकऱ्यांच्या—बहुजनांच्या विजयाची कथा सांगणारी महान परंपरा शाहीर विलास घोगरे यांच्या पाठीशी होती. ('विद्रोही' शाहिरी विशेषांक)

लोकशाहीर विलास घोगरे यांच्याकडून युग मनुवादावर विजय मिळविण्याचीर विषमतावादी भांडवलशाहीवर मात करणाऱ्या संस्कृतीची रचना केल्या गेली. त्यांच्या कवितेत संस्कृती आणि नवा समाज निर्माण करण्याची सामर्थ्ये एकवटली दिसतात. 'भगत सिंगाचा पोवाडा', 'जळतोय मराठवाडा', 'शेतमजुराचे ऐक्य', 'कष्टकरी, बुद्धिजीवी वर्गा'चे ऐक्य' या मूलभूत प्रश्नांची जाणीव त्यांच्या कवितांनी व्यक्त केलेली आहे.

किती आवरू भूक मालका
किती आवरू भूक रे
तु घेऊन आमचा घामरे
अन् माल कमवला जामरे

अशा गाण्यांच्या शब्दांनी कामगारांमध्ये एक वर्गीय जाणीव आणली.

मुंबईतील १९८२ च्या ऐतिहासिक गिरणी संपात त्याने लिहिलेल्या गीताने गिरण्याचे गेट, गिरणगावातील चौक आणि अटक झालेल्या आंदोलनकर्त्यांच्या पोलीस कोठडयात दुमदुमत होत्या.

आता मर्दाचं पाणी गडया दावायचं हायं
संप रेटायचा हाय मागं घ्यायचा नाय.!

हे त्यावेळचं त्याचं गीत आजही गिरणी कामगारांच्या ओठावर आहे. वस्ती जगली पाहिजे कामगार टिकला पाहिजे हा त्याचा आग्रह त्यांच्या कवितेत दिसतो. कंपनीच्या गेटवर, चौकातील आंदोलनात आदिवासींच्या जंगलात खेडयापाडयातील दलित वसत्यांमध्ये स्वत: फिरून त्यांनी आपल्या गीतांनी आणि शहिरीने चळवळीला साथ दिली.

दुनिया के मजदुरो एक हो
आपस में नही लडना
कंधे से कंध मिलाके चलो
लाल झंडा लेकर बढ़ना

अशाप्रकारे जगातील कामगारांना संगठीत होण्याचे आवाहन करण्याचे त्याचे स्वप्न त्यांची शहिरी आशावाद पेरत होती.

१९७८ नंतर नामांतर दंगलीने मराठवाडा पेटला. त्यावेळी उमद्या वयात हातात डफली घेऊन मराठवाडयाचा रानोमाळ तुडवणारा आणि त्यानंतर तब्बल १९ वर्ष चळवळीत त्यांनी घालविली.

प्रसंग ताडा तो हाणून पाडा
जुपा एकीचा गाडा रे
बघा जळतोय मराठवाडा

हे त्यांच मराठवाडा नामांतरच्या वेळचं गीत महाराष्ट्रात सुप्रसिद्ध झालं होतं. आजही या गीताने क्रांतिकारी चळवळीला उर्जा देण्याची ताकद कमविली आहे.

२३ मार्च १९८२ ला नौजवान भारत सभेचं पहिलं अधिवेशन झालं. त्यावेळी अधिवेशनासाठी मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशनवर बसून शहीद भगतसिंग यांच्यावर पोवाडा लिहिला होता.

२३ मार्च दिवस उगवला
भारत देशाला सांगूनी गेला
जीना है तो मरना सिखो यारो
कदम कदम पे लढना सिखो यारो

हा पोवाडा आजही डाव्या चळवळीतील कार्यकर्त्यांच्या ओठावर आहे.

आपल्या पहाडी आवाज दलित शोषित, कष्टकरी जनतेच्या संघटित होण्यासाठी नव्या नेतृत्वासाठी हा शाहिर झटला. दलितांच्या मुक्तिचा अंतिम मार्ग मार्क्सवाद—लेनिनवाद—माओ विचारधारा होऊ शकते हा त्यांचा विश्वास होता.

त्या थेंबा थेंबा मधुनी
जी स्वैर उमटतील गाणी
गाणारे लाखो असतील
पिळणारा नसेल कोणी ...

येथील सरंजामी अर्थव्यवस्था जातीय शोषणांवर बुद्धिजीवी, दलित बुद्धिजीवीचा नाकर्तेपणाची भूमिका यावर प्रचंड राग होता.

रक्ताची दलिता आन
अन्याय स्थळी जाऊन
शीर तळहाती घेऊन
हे बंधो जगरे मरून

अशी जातीय अंताविषयीची जाणीवही वास्तववादी वैज्ञानिक धारदार होती.
परंपरागत आणि जळमटलेल्या संस्कृतीला छेद देण्याची ताकद त्यांच्या गीतांमध्ये होती.

उठ माणसा, उठ आता तू
तोड जातीच्या बेडया,
गुलामगिरीची उचलून तिरडी तोडून टाक या खोडया.

हे श्रीपाल सबनीस यांचचं गाणं किंवा

तेव्हा तू कसं विचारलं नाय की
आमची जात कोणती हाय
अन् आमचा धर्म कोणता हाय

अशी अनेक गाणी सुद्धा त्यांनी आपल्या शहिरीतून गायली.
दलित, कष्टकरी वंचितांच्या हक्काच जाणीव त्यांच्या कवितेत दिसते. तशी शेतकरी आदिवासींच्या वस्तीत परीवर्तनाची चिंगारी पेटविण्यासाठी ते दंडकारण्यात जाऊन गीत गायन करायचे.

टेकडीच्या पायथ्याला
छोटासा गाव रं
जंगलचा राजा हाय तुझं नाव रं.

असे म्हणून आदिवासींच्या सामर्थ्याची जाणीव निर्माण करण्याचे कामही ते आपल्या कवितेतून करतात.
आदिवासी कष्टकऱ्यांचे सामर्थ्यवर्णन करीत तर दुसऱ्या बाजूला जंगला पहाडातून खेडया पाडयातून मुंबई शहरात उदरनिर्वाहासाठी आलेल्या लोकांसाठीही त्यांची कविता झिजलेली दिसते. ‘मुंबईची लावणी’ मध्ये ही भावना फार सामर्थ्याने त्यांनी व्यक्त केली दिसते.

मला मुंबई आयवानी वाटली
तिला पैसेवाल्यांनी लाटली.

भारतातील वंचिताच्या शोषितांच्या हक्कासाठी त्यांच्या पाठीशी असणारी त्यांची शाहिरी येथील स्त्रीच्या हक्काचेही गुणगाण करतांना दिसते.

आओ लोगो और समझलो
आज का किस्सा नारी का
आदम भुल गया नर है आखिर
आधा हिस्सा नारी का.

## समारोप :—

'हम मानवता के रखवाले, कॉम्रेड है कॉम्रेड' म्हणत आपल्या जगण्याची मतीतार्थ वर्णन करणारा हा लोककवी विरळाच होता. त्यांनी आपल्या शाहिरीतून, कवितेतून मराठी व हिंदी भाषेचा वापर करून अनेक विषयावर भाष्य केलेले दिसते. त्यांच्या कवितेत वर्ग जाणीवही प्रमुख असली तरी भारतीय जातीवादाचाही पर्दाफाश केलेला आहे. 'मार्क्सवादी—लेनिनवादी—माओवादी विचारांच्या मुशीत घडले असले तरी विलासची गाणी जात वर्गीय सामाजिक वास्तवाला थेट भिडणारी आहेत'. असे सुधीर ढवळे यांनी म्हटले ते खरे वाटते. त्यांची कविता सांस्कृतिक, सामाजिक उन्नतीची, वर्गीय राजकीय संघर्षाची आणि कष्टकऱ्यांच्या—बहुजनांच्या विजयाची काहाणी सांगते. कष्टकरी, कामगार, दलित, शेतकरी, आदिवासी आणि शोषित स्त्री ही सर्व बहुजन घटक त्यांच्या कवितेचा विषय होतात, त्यांच्या चळवळीचा केन्द्र बिंदू होतात. या सर्व असंघटीत घटकांना एकत्र करून समान भारत निर्माण करणाऱ्या या शाहिराचा आशावाद फार सामर्थ्यशाली व भारतीय वर्ग, वर्ण विषमतेला मूठमाती देण्याचा कामाचा आहे.

कवी, शाहीर, कार्यकर्ता व लोकसंगीताचा बाज असलेला मुरलेला कलावंत म्हणून लोकशाहीर विलास घोगरे फार महत्त्वाचे शाहीर आहेत. शाहिरी परंपरेत श्रेष्ठ आहेत.

## संदर्भग्रंथ :—

१. महात्मा फुले आणि सत्यशोधक जलसे, संभाजी खराट, साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, १९९०.
२. लोकरंगभूमी, डॉ. प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, १९९४.
३. लोकनाटयाची परंपरा, वि.कृ. जोशी, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९६१.

## नियतकालिके सूची :—

१. दलित रंगभूमी विशेषांक, १४ एप्रिल १९८५, पुणे.
२. विद्रोही, शाहिरी विशेषांक, ऑगस्ट—सप्टेंबर २००७, संपादक सुधिर ढवळे.
३. विद्रोही, सडक नाटक विशेषांक, जुलै—ऑगस्ट २००८, संपादक सुधिर ढवळे.